# ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच

## (विद्युत कायदा, २००३ अंतर्गत कलम ४२ (५) अन्वये स्थापित )

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## जळगाव परिमंडळ

दुरध्वनी क्र. ०२५७ – २२७३००४
Email :-cgrfjalgaonzone@gmail.com
cejalgaon@mahadiscom.in.
cgrfjalgaon@mahadiscom.in

ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच
जुनी एम.आय.डी.सी.
अजिंठा चौफुली
जळगाव –४२५ ००३

---

जा.क्रः स.स./ग्रागानिमं/जप/ज.मं./सावदा/३-१४/ No 00120 दिनांक 16 AUG 2014

(रजिस्टर पोच व्दारे)

गाऱ्हाणे दाखल दिनांकः २२/०१/२०१४
निकाल दिनांक : १४/०८/२०१४

प्रति,

१. श्रीमती विलास माधव नेमाडे,
माधवाश्रय, गायत्री शक्तीपीठ रोड,
भुसावळ ४२५२०१
(ग्रा.क्र. ११२०९६००८६३८) } तक्रारदार

२. नोडल अधिकारी
म.रा.विज वितरण कंपनी (मर्या.),
मंडल कार्यालय, विद्युत भवन, जळगांव
३. कार्यकारी अभियंता ,
म.रा.विज वितरण कंपनी (मर्या.),
विभागिय कार्यालय, सावदा } वीज वितरण कंपनी

कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं. ,जळगांव ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच

---

## निर्णयपत्र

श्री. विलास माधव नेमाडे. ता. भुसावळ, जि. जळगाव. हे विज वितरण कंपनीचे शेती पंपाचे ग्राहक आहेत. त्यांनी म.रा.विज वितरण कंपनीकडे मीटर वाचनाप्रमाणे वीज बिल मिळणेबाबत तक्रार अर्ज सादर केला. या विषयी महाराष्ट्र राज्य विद्‌युत वितरण कंपनीच्या अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण समितीकडे दि. ०६.०९.२०१३. रोजी तक्रार दाखल केली. पण अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण समिती कडुन विहीत कालावधीत कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने आपले गाऱ्हाणे त्यांनी अनुसुची 'अ' मध्ये मंचाकडे सादर केले. ते मंचाकडे आवक क्रमांक १०९ अन्वये दि. २२.०१.२०१४. रोजी नोंदविण्यात आले.



Scanned by CamScanner

मंचाच्या अध्यक्षांचे व सदस्याचे पद रिक्त असल्याने हे प्रकरण लगेच सुनावणीस घेता आले नाही. नवीन अध्यक्षांची नियुक्ती झाल्यानंतर व त्यांनी पदभार धारण केल्यावर त्यांच्याशी सल्लामसलत करून हे प्रकरण सुनावणीस घेण्याचा निर्णय घेण्यात आला. या परिस्थितीमुळे या प्रकरणात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल), विनियम २००६ मधील नियम क्र. ६.१८ च्या अनुषंगाने या गाऱ्हाण्या संबंधी निर्णय प्राप्त दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत मंच देवू शकलेला नाही, ही बाब येथे नमुद करण्यात येत आहे. मंचाच्या सदस्याचे पद अदयापही रिक्त आहे.

गाऱ्हाणे अर्जाची सुनावणी महावितरणच्या अजंठा रोड, जळगाव येथील विश्रामगृहांत दि. ११.०७.२०१४ रोजी निश्चित करण्यात आली. या संबंधीची सुचना तक्रारदार ग्राहक व वितरण कंपनीच्या संबंधीत अधिकाऱ्यांना दि.२५.०६.२०१४ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली. याच पत्रासोबत तक्रार अर्जाची प्रत नोडल अधिकारी, जळगाव मंडळ कार्यालय, जळगाव व कार्यकारी अभियंता, सावदा यांना देवुन तक्रार अर्जानुसार मुद्देनिहाय अभिप्राय १५ दिवसात मंचाकडे सादर करण्याबाबत व त्याची प्रत ग्राहकाला पोहचविण्याबाबत सुचित करण्यात आले.

सुनावणीस विद्युत वितरण कंपनी तर्फे नोडल अधिकारी श्री. आर.व्ही.सुशीर, कार्यकारी अभियंता सावदा विभाग, श्री.एस.के. बंड. सहाय्यक अभियंता फैजपुर उपविभाग श्री.डी. एन. पाटील., हे उपस्थित होते. तर ग्राहक स्वतः उपस्थित होते.

**ग्राहकाची बाजू:**

१. श्री विलास माधव नेमाडे यांचे जुने घर सांगवी बु , ता. यावल. येथे घरगुती वीज कनेकशन आहे. त्यांचा ग्राहक क्र. ११२०९६००८६३८ असा आहे. सदर घरात बऱ्याच वर्षापासुन विजेचा वापर नाही. तसेच मीटर घराचे बाहेर आहे.

२. सदर कनेकशनचा विज पुरवठा दि. ०२.०७.२०१३. पासुन खंडीत केला आहे.(थकबाकी पोटी) आज रोजी मीटर वर ४९०६ असे रिडींग आहे. तरी सुध्दा मीटर फॉल्टी म्हणून शेरा देवुन सरासरी बीले दिलेली आहेत. ती मान्य नाहीत.

३. तसेच त्यांनी सहाय्यक अभियंता फैजपुर यांचेकडे १५.०७.२०१३. व आय.जी.आर.सी. जळगाव मंडळ कार्यालय यांचे कडे दि.६.०९.२०१३. नुसार कंपनीकडे पत्रव्यवहार केला पण अद्याप बिल दुरूस्त करून दिलेले नाही. सबब मंचाकडे तक्रार दाखल करावी लागली.

**ग्राहकाच्या मागण्या :-**

१. देण्यात आलेली सर्व बिले मागे घेण्यात यावी.

२. मीटरवरील दि. ०२.०७.२०१३. चे रिडींग नुसार म्हणजेच ४९०६ नुसार किंवा आज असलेल्या रिडींग नुसार बीले देण्यात यावी. मीटर फिरले नसल्यास शुन्य युनीटची बीले देण्यात यावे.

३. आजतागायत भरलेली रक्कम समायोजित करून उर्वरीत बील देण्यात यावे.

४. तसेच सहाय्यक अभियंता फैजपुर यांचेकडे १५.०७.२०१३. व आय.जी.आर.सी. जळगाव मंडळ कार्यालय यांचे कडे दि.६.०९.२०१३. नुसार लेखी तक्रार देवुन सुध्दा कोणताही पत्रव्यवहार किंवा तक्रारीस उत्तर म.रा.वि.वि.कंपनीने मुदतीचे आत दिले नाही म्हणुन एस. ओ. पी. नुसार कार्यवाही होवुन कॉम्पेन्सेशन मिळावे.

५. तक्रारीचा योग्य विचार व्हावा व मीटर वाचनानुसार बील मिळावे म्हणजे बीलाचा भरणा त्वरीत करता येईल.



Scanned by CamScanner

**वितरण कंपनीची बाजू :-**

वितरण कंपनीच्या वतीने कार्यकारी अभियंता सावदा यांचे पत्र दि. ०९.०७.२०१४ व सी.पी. एल. च्या नोंदी मंचापुढे सादर केल्या. आपली बाजु मांडतांना वितरण कंपनीच्या प्रतिनिधीनी सांगितले की :

१. ग्राहक क्र. ११२०९६००८६३८ ला सप्टेंबर २००८ पासुन फॉल्टी, नॉर्मल (मीटर वाचन) प्रमाणे अशी बिले दिलेली आहेत. सदर ग्राहकानी सदर विज बिलापोटी सप्टेंबर २०१२ पर्यंत विज बील भरणा केलेला आहे. त्यांनी ऑक्टोबर २०१२ पासुन फॉल्टी बिले भरली नाहीत. त्यांनी तक्रार केल्यावर त्यांना माहे डिसेंबर २०१३ ला मागील फॉल्टी बिले रू. ४४२२.७२ एवढी रक्कम कमी करण्यात आलेली आहे.

२. त्यानंतर आजपर्यंत सदर ग्राहकाला (टी.डी.) कमीत कमी आकाराचे बील दिले जात आहे. सदरहु तक्रार डिसेंबर २०१३ ला निकाली काढलेली आहे.

**मंचाचे निश्कर्षः**

१. मंचाने दि. २५/०६/२०१४ रोजीच्या सुचनापत्रान्वये वितरण कंपनीच्या नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मंडल कार्यालय, जळगाव यांना ग्राहकाच्या तक्रार अर्जाची प्रत देवून तक्रार अर्जानुसार मुद्देनिहाय अभिप्राय १५ दिवसात मंचाकडे सादर करण्याबाबत व त्याची प्रत ग्राहकाला पोहोचविण्याबाबत तसेच सुनावणीस हजर राहाण्याबाबत सूचित केले होते. पण नोडल अधिकारी यांनी तक्रार अर्जावर मुद्देनिहाय अभिप्राय दिलेला नाही. तसेच या पत्राची प्रत तक्रारदार ग्राहकास दिलेली नाही.

२. तक्रारदार ग्राहकाने जळगाव मंडळ कार्यालयाच्या अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दि. ०६.०९.२०१३. नुसार लेखी तक्रार सादर केली आहे. संबंधीत नोडल अधिकारी हेच या प्रकरणात अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचे प्रमुख आहेत. मात्र यावर अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने काय कारवाई केली यांचा कुठलाही खुलासा नोडल अधिकारी यांच्या पत्रात नाही. यावरुन संबधित नोडल अधिकारी/अंतर्गत तक्रार निवारण कक्ष प्रमुख तक्रारदार ग्राहकांच्या तक्रारीबाबत पुरेसे संवेदनाशील व गंभीर नाहीत असे दिसते. ही बाब मुख्य अभियंता, जळगाव परिमंडळ व अधिक्षक अभियंता, जळगाव मंडल यांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

३. सी.पी.एल. चे अवलोकन केले असता असे दिसते कीः
   १. ग्राहकास सप्टेंबर २००८ पासुन मिटरचा स्टेटस फॉल्टी दाखवून सरासरी बिले दिलेली आहेत
   २. डिसेंबर २०१३ मध्ये वीज पुरवठा तात्पुरता खंडीत (टी.डी.) केला आहे.
   ३. नंतर ग्राहकाला माहे डिसेंबर २०१३ मध्ये मागील कालावधीसाठी रिडींग दुरूस्ती करून रू. ४४२२.७२ एवढी रक्कम वजावट केली आहे. या वेळचा स्थळ पाहणी अहवाल सादर केलेला नाही. मात्र सी.पी.एल. नुसार ऑक्टोबर २०१० ला ५००० नोंदवलेली ही चालू रिडींग नोव्हेंबर २०१३ अखेरपर्यंत कायम आहे. या मीटरवर दि.०२.०७.२०१३ ची रिडींग ४९०६ असल्याचे ग्राहकाने नमूद केले आहे.

४. याचा अर्थ तक्रार ग्राहकास प्रत्यक्षातील रिडींग्जवर आधारीत बिले न देता सरासरी बिले दिली गेलेली आहेत. म.रा.विद्युत आयोगाने आदेश दि. २२/०८/२००५ (प्रकरण क्र. २/२००३) च्या परिच्छेद ४५ (ए) प्रमाणे सरासरी बिलाबाबत खालील स्पष्ट निर्देश दिले आहेतः



Scanned by CamScanner

"......no billing using past consumption or some related 'average' basis should be resorted to for more than a period of 3 months. (Where average billing has been continuing for more than that period just prior to 1st June, 2004, then it cannot be continued from that date. In case average billing has been resorted to for, say, 2 months prior to that, it can be continued only for upto one month more). During that period of 3 months, the meter should have been tested/ replaced, with the results intimated to the consumer, and appropriate bill adjustments carried out thereafter (where such average billing is being done on the basis of presumed faulty meter, and where defectiveness of the meter has accordingly been established). If due and timely diligence has not been exercised by the licensee, he cannot claim the right to continue billing on a presumptive, average basis. The same principle will apply to all other situations in which such 'average' billing has been resorted to, except in cases where the meter is not accessible. (However, the Commission notes that, in the case of locked/ inaccessible meters, the licensees have recourse to the remedies provided under Section 163 of EA, 2003, and it would be expected that MSEB would exercise it sooner rather than later."

५. म.वि.आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता २००५ च्या विनियम १४.३ नुसार व वितरण परवानेधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चीतीकरण विनियम, २००५ च्या विनियम ९.१ प्रमाणे " मीटरच्या नोंदी घेण्याचे काम अधिकृत प्रतिनिधीकडून कृषि ग्राहकांच्या बाबतीत तीन महिन्यातून एकदा" घेणे आवश्यक आहे. या विनियमांचेही पालन वितरण कंपनीने प्रस्तुत प्रकरणात केलेले नाही. याबाबत कार्यकारी अभियंता , सावदा यांनी जवाबदार कर्मचाऱ्यांची चौकशी करून कारवाई करावी , असे मंच सूचित करीत आहे.

६. डिसेंबर २०१३ मध्ये मागील कालावधीसाठी दुरूस्ती करून रू. ४४२२.७२ एवढी रक्कम वजावट केल्यावर निव्वळ बिल रु. १२९६ चे देण्यात आले . ग्राहकाने त्यापोटी २७/०१/२०१४ रु. १३०० भरले आहेत. त्यांतर वीज पुरवठा तात्पुरता खंडीत (टी.डी.) असून वेळोवेळी आलेली बिले ग्राहक भरीत आहे. वास्तविक जानेवारी १४ पासून थकबाकी नसतानाही वीज पुरवठा खंडीत ठेवण्याचे कारण नाही. म्हणून मंच असे निर्देश देत आहे की वितरण कंपनीने वीज पुरवठा पुनर्जोडणी आकार न घेता त्वरीत चालू करावा.

७. म.वि.आयोगाच्या (वितरण परवानेधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २००५ च्या विनियम ९.१ मधील कृती-मानकानुसार मीटर वाचन अचुकपणे घेण्यास वितरण कंपनीस अपयश आल्यामुळे याच विनियमांच्या परिशिष्ठ अ मधील अ.क्रं. ७(१) नुसार पहिल्या महिन्याच्या विलंबासाठी रु. १०० व पुढील विलंबासाठी प्रतिमहा रु. २०० प्रमाणे भरपाई ग्राहकास देय आहे. मात्र या विनियमांच्या कलम १२.२ नुसार कमतरता दूर करण्यात आल्यावर ६० दिवसाचे आत ग्राहकाने भरपाईचा दावा दाखल करणे आवश्यक आहे.

८. प्रस्तुत प्रकरणात डिसेंबर २०१३ मध्ये कमतरता दूर करण्यात आली. भरपाई दावा २२ जानेवारी २०१४ ला म्हणजे ६० दिवसाचे आत दाखल केला आहे. वितरण कंपनीने डिसेंबर २०१३ मध्ये मागील कालावधीसाठी दुरूस्ती करून रू. ४४२२.७२ चे क्रेडीट दिले आहे. जेवढ्या महीन्यांसाठी ही दुरुस्ती केली आहे तितके महिने कृती-मानकानुसार मीटर वाचन अचुकपणे घेण्यास वितरण कंपनीस अपयश आले आहे. त्यामुळे पहिल्या महिन्यांच्या विलंबासाठी रु. १०० व पुढील विलंबासाठी प्रतिमहा रु. २०० प्रमाणे भरपाई ग्राहकास दयावी असे निर्देश मंच देत आहे.



Scanned by CamScanner

ग्राहकाचे प्रतिनिवेदन , विद्युत वितरण कंपनीचा खुलासा व सादर करण्यात आलेली कागदपत्रे या सर्व बाबींचा विचार करून मंच या प्रकरणी खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

## निर्णय

१. म.वि.आयोगाच्या (वितरण परवानेधारकांच्या कृतीची मानके, विद्‌युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चिीतीकरण) विनियम, २००५ च्या विनियम ९.१ नुसार मीटर वाचन अचुकपणे घेण्यास वितरण कंपनीस अपयश आल्यामुळे याच विनियमांच्या परिशिष्ठ अ मधील अ.क्रं. ७ (१) नुसार डिसेंबर २०१३ मध्ये मागील जितके महिने कालावधीसाठी दुरूस्ती केलेली आहे , तेवढ्या महीन्यांच्या अपयशासाठी वितरण कंपनीने ग्राहकास पहिल्या महिन्यांच्या विलंबासाठी रु. १०० व पुढील विलंबासाठी प्रतिमहा रु. २०० प्रमाणे भरपाई दयावी. भरपाईची रक्कम या आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसाचे आत ग्राहकाच्या देयकात समायोजित करण्यात यावी.

२. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ), विनियम २००६ मधील नियम क्र. ६.१२ नुसार नोडल अधिकारी यांनी या आदेशाच्या पूर्ततेचा व आदेशातील दखल पात्र निश्कर्ष यांवरील कारवाईचा अहवाल मंचाकडे एक महिन्याच्या आत सादर करावा.

३. निर्देशित कालावधीत वितरण कंपनीने या आदेशाची अमलबजावणी न केल्यास म.वि.नि.आ. (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल), विनियम २००६ मधील नियम क्र. २२ अन्वये तक्रारदार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे दाद मागू शकतात.

४. या निर्णया विरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल), विनियम २००६ मधील नियम क्र. १७.२ नुसार मा. विद्युत लोकपाल यांचेकडे , (व्दारा - महाराष्ट्र वीज नियामक आयोग, ६०६ ''केशवा'' बंगला, बांद्रा कॉम्पलेक्स (पुर्व) मुंबई- ४०००५१) येथे या आदेशाच्या दिनांकापासून ६० दिवसाच्या आत ते अपील करु शकतात.

**बिभीषण सु. निर्मळ.**
सदस्य-सचिव

**सुरेश पां. वाघ**
अध्यक्ष

**ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, जळगाव परिमंडळ**

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषितः

१. मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.(मर्या.), विद्युत भवन, परिमंडळ कार्यालय, जळगांव

२. अधिक्षक अभियंता म.रा.वि.वि.कं.(मर्या.) मंडळ कार्यालय,जळगांव



Scanned by CamScanner